# धर्मांतरित बौद्ध महिलांच्या सामाजिक समस्या व सक्षमीकरण

[1.]श्री. संजय चंद्रभान मेश्राम
संशोधनकर्ता

[2.]प्रा. डॉ. विठ्ठल चव्हाण
मार्गदर्शक
समाजशास्त्र विभाग प्रमुख,
आदर्श कला व वाणिज्य महाविद्यालय,
देसाईगंज (वडसा) जि. गडचिरोली

================================================================

## सारांश

1956 साली डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या धर्मांतरामुळे दलित समाजाला सामाजिक समता, मानवी प्रतिष्ठा व स्वाभिमान मिळविण्याची दिशा प्राप्त झाली. या परिवर्तन प्रक्रियेत धर्मांतरित बौद्ध महिलांची भूमिका अत्यंत महत्त्वाची राहिली आहे. तथापि, धर्मांतरानंतरही या महिलांना विविध सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक समस्यांना सामोरे जावे लागत आहे. प्रस्तुत संशोधनात धर्मांतरित बौद्ध महिलांच्या सामाजिक समस्या व त्यांच्या सक्षमीकरणाच्या प्रक्रियेचा सविस्तर अभ्यास करण्यात आला आहे.

प्रस्तुत संशोधनात शिक्षणाचा अभाव, आर्थिक दुर्बलता, रोजगाराची असुरक्षितता, सामाजिक भेदभाव, कौटुंबिक हिंसाचार आणि आरोग्यविषयक समस्या या प्रमुख अडचणींचे विश्लेषण करण्यात आले आहे. पितृसत्ताक मानसिकता व जातीय पूर्वग्रहांमुळे महिलांच्या सामाजिक सहभागावर मर्यादा येताना दिसतात. धर्मांतरामुळे वैचारिक मुक्तता व आत्मसन्मान मिळाला असला तरी सामाजिक वास्तवात परिवर्तनाची गती संथ असल्याचे आढळते. सक्षमीकरणाच्या दृष्टीने शिक्षण, आर्थिक स्वावलंबन, कायदेशीर जागृती, आरोग्य सुविधा आणि राजकीय सहभाग या घटकांवर विशेष भर देण्यात आला आहे. शासनाच्या

विविध कल्याणकारी योजनांचा लाभ उपलब्ध असला तरी त्यांची प्रभावी अंमलबजावणी आवश्यक आहे. या संशोधनातून असे निष्कर्ष निघतात की, धर्मांतरित बौद्ध महिलांचे सर्वांगीण सक्षमीकरण साधण्यासाठी शासन, समाज व स्वयंसेवी संस्थांचे संयुक्त प्रयत्न अत्यावश्यक आहेत.

**कळीचे शब्द (Keywords):** धर्मांतरित बौद्ध महिला, सामाजिक समस्या, महिला सक्षमीकरण, दलित महिला, सामाजिक भेदभाव, दुर्बलता, जातीय विषमता, शैक्षणिक मागासलेपणा, आर्थिक दुर्बलता, रोजगार संधी, संविधानिक हक्क, सामाजिक न्याय, बौद्ध तत्त्वज्ञान, आत्मसन्मान, महिला चळवळ, समावेशक विकास

## प्रस्तावना

भारतीय समाजव्यवस्था ऐतिहासिकदृष्ट्या जात, वर्ग आणि लिंगभेदावर आधारित राहिलेली आहे. या सामाजिक संरचनेत दलित समाजाला दीर्घकाळ सामाजिक अन्याय, अपमान आणि शोषण सहन करावे लागले. या अन्यायकारक व्यवस्थेविरोधात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सामाजिक समता, स्वातंत्र्य आणि मानवी प्रतिष्ठा प्रस्थापित करण्यासाठी संघर्ष केला. त्याचाच एक महत्त्वाचा टप्पा म्हणजे **14** ऑक्टोबर **1956** रोजी नागपूर येथे झालेला बौद्ध धर्मांतराचा ऐतिहासिक प्रसंग. हे धर्मांतर केवळ धार्मिक बदल नव्हते, तर सामाजिक परिवर्तनाचे प्रभावी साधन होते.

या धर्मांतर प्रक्रियेत धर्मांतरित बौद्ध महिलांची भूमिका अत्यंत महत्त्वाची राहिली आहे. पारंपरिक समाजव्यवस्थेत या महिलांना दुहेरी शोषणाला सामोरे जावे लागले–एक स्त्री म्हणून आणि दुसरे दलित म्हणून. धर्मांतरामुळे त्यांना आत्मसन्मान, वैचारिक स्वातंत्र्य आणि समानतेची जाणीव मिळाली. तथापि, धर्मांतरानंतरही महिलांच्या सामाजिक जीवनातील अडचणी पूर्णतः संपल्या नाहीत.

आजही धर्मांतरित बौद्ध महिलांना शिक्षणाचा अभाव, आर्थिक दुर्बलता, बेरोजगारी, सामाजिक भेदभाव, कौटुंबिक हिंसाचार आणि आरोग्यविषयक समस्यांचा सामना करावा लागत आहे. पितृसत्ताक

मानसिकता व जातीय पूर्वग्रहांमुळे त्यांच्या सामाजिक प्रगतीवर मर्यादा येतात. या पार्श्वभूमीवर धर्मांतरित बौद्ध महिलांच्या सामाजिक समस्या व त्यांच्या सक्षमीकरणाचा अभ्यास करणे अत्यंत आवश्यक ठरते. प्रस्तुत संशोधनात या महिलांच्या जीवनस्थितीचे विश्लेषण करून धर्मांतरित बौद्ध महिलांच्या सामाजिक समस्या, त्या समस्यांची कारणे आणि महिलांच्या सक्षमीकरणाच्या विविध पैलूंसोबतच त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक उपाययोजनांचा विचार करण्यात आला आहे.

## संशोधनाची उद्दिष्टे

1. धर्मांतरित बौद्ध महिलांच्या प्रमुख सामाजिक समस्यांचा अभ्यास करणे.
2. शिक्षण, रोजगार व आरोग्याच्या संदर्भात त्यांच्या सामाजिक स्थितीचे विश्लेषण करणे.
3. धर्मांतरानंतर महिलांच्या सामाजिक स्थानात झालेले बदल समजून घेणे.
4. धर्मांतरित बौद्ध महिलांच्या सक्षमीकरणाच्या प्रक्रियेचा आढावा घेणे.
5. महिलांच्या सर्वांगीण सक्षमीकरणासाठी उपाययोजना व शिफारशी सुचविणे.

## संशोधन पद्धती

सदर संशोधनासाठी वर्णनात्मक व विश्लेषणात्मक पद्धतीचा अवलंब करण्यात आला आहे. प्राथमिक माहिती मुलाखती, निरीक्षण व क्षेत्रीय अनुभवांच्या आधारे, तर दुय्यम माहिती पुस्तके, संशोधन लेख, शासकीय अहवाल, जनगणना, सामाजिक संस्थांचे अहवाल आणि नियतकालिकांमधून संकलित करण्यात आली आहे.

## धर्मांतरित बौद्ध महिलांची सामाजिक पार्श्वभूमी

धर्मांतरित बौद्ध महिलांची सामाजिक पार्श्वभूमी ही भारतीय समाजव्यवस्थेतील ऐतिहासिक विषमता, जातीय भेदभाव आणि पितृसत्ताक रचनेशी निगडित आहे. या महिला प्रामुख्याने पूर्वी अस्पृश्य समजल्या जाणाऱ्या दलित समाजातून आलेल्या असून पारंपरिक हिंदू समाजरचनेत त्यांना

सामाजिक बहिष्कार, अपमान आणि अन्यायाला सामोरे जावे लागले आहे. स्त्री म्हणून त्यांच्यावर लिंगाधारित बंधने लादली गेली, तर दलित म्हणून जातीय शोषणाचा दुहेरी भार त्यांनी सहन केला. त्यामुळे त्यांची सामाजिक स्थिती अत्यंत दुर्बल व वंचित स्वरूपाची राहिली.

**1956** साली डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या बौद्ध धर्मांतरामुळे या महिलांच्या सामाजिक जीवनात महत्त्वाचा वळणबिंदू निर्माण झाला. बौद्ध धर्मातील समता, करुणा, प्रज्ञा आणि मानवी प्रतिष्ठेच्या मूल्यांमुळे धर्मांतरित बौद्ध महिलांना आत्मसन्मानाची जाणीव प्राप्त झाली. त्यांनी स्वतःकडे केवळ शोषित घटक म्हणून न पाहता समान अधिकार असलेल्या नागरिक म्हणून पाहण्यास सुरुवात केली. परंतु धर्मांतरामुळे वैचारिक बदल घडून आला असला तरी सामाजिक संरचना व मानसिकता त्वरित बदलली नाही. धर्मांतरानंतरही अनेक धर्मांतरित बौद्ध महिलांना शिक्षण, रोजगार, आरोग्य आणि सामाजिक स्वीकाराच्या बाबतीत अडचणींचा सामना करावा लागतो. ग्रामीण भागात या अडचणी अधिक तीव्र स्वरूपात दिसून येतात. सामाजिक रूढी, आर्थिक गरिबी आणि पितृसत्ताक मानसिकता यांचा त्यांच्या जीवनावर अजूनही प्रभाव आहे. तरीसुद्धा शिक्षण, सामाजिक चळवळी आणि संघटनांच्या माध्यमातून धर्मांतरित बौद्ध महिलांची नवी सामाजिक ओळख घडताना दिसते. ही पार्श्वभूमी समजून घेणे त्यांच्या समस्यांचा व सक्षमीकरणाच्या प्रक्रियेचा अभ्यास करण्यासाठी अत्यंत महत्त्वाचे आहे.

## धर्मांतरित बौद्ध महिलांच्या सामाजिक समस्या

धर्मांतरित बौद्ध महिलांच्या सामाजिक समस्या बहुआयामी स्वरूपाच्या आहेत. यामध्ये प्रामुख्याने खालील समस्यांचा समावेश होतो.

**1.** शिक्षण व स्वाक्षरतेचे कमी प्रमाण: शिक्षण हे सामाजिक परिवर्तनाचे प्रभावी साधन असले तरी धर्मांतरित बौद्ध महिलांमध्ये साक्षरतेचे प्रमाण अपेक्षेप्रमाणे वाढलेले दिसत नाही. आर्थिक गरिबी, पालकांची शिक्षणाबाबतची मर्यादित जाणीव, लवकर विवाह, घरगुती जबाबदाऱ्या आणि सुरक्षिततेची भीती यांमुळे

अनेक मुलींचे शिक्षण अर्धवट राहते. ग्रामीण भागात शाळांपर्यंतची अपुरी सुविधा आणि उच्च शिक्षण संस्थांची कमतरता यामुळे शिक्षणातील दरी अधिक वाढते. परिणामी महिलांचा सामाजिक आत्मविश्वास आणि रोजगाराच्या संधी मर्यादित राहतात.

**2.** आर्थिक दुर्बलता व रोजगारीचा अभाव**:** धर्मांतरित बौद्ध महिला प्रामुख्याने असंघटित क्षेत्रात कार्यरत आहेत. शेतीमजुरी, बांधकाम कामगार, घरकाम किंवा सफाई कामे अशा अल्प उत्पन्नाच्या व्यवसायांवर त्यांची उपजीविका अवलंबून असते. नियमित रोजगाराचा अभाव, कौशल्य विकासाच्या संधींची कमतरता आणि भांडवलाची अडचण यामुळे आर्थिक स्वावलंबन साध्य होत नाही. आर्थिक दुर्बलतेमुळे महिलांचे निर्णयस्वातंत्र्य मर्यादित राहते.

**3.** सामाजिक भेदभाव व जातीय मानसिकता**:** धर्मांतरानंतरही समाजातील जातीय मानसिकता पूर्णतः नष्ट झालेली नाही. सार्वजनिक ठिकाणी, शिक्षणसंस्था, रोजगारस्थळे आणि सामाजिक व्यवहारात धर्मांतरित बौद्ध महिलांना सूक्ष्म स्वरूपाचा भेदभाव सहन करावा लागतो. या भेदभावामुळे महिलांमध्ये न्यूनगंड निर्माण होतो आणि सामाजिक सहभाग कमी होतो. सामाजिक स्वीकाराच्या अभावामुळे त्यांच्या प्रगतीला अडथळे निर्माण होतात.

**4.** कौटुंबिक समस्या व कौटुंबिक हिंसाचार**:** पितृसत्ताक कुटुंबव्यवस्थेमुळे धर्मांतरित बौद्ध महिलांना घरातील निर्णयप्रक्रियेत दुय्यम स्थान दिले जाते. दारिद्र्य, बेरोजगारी, व्यसनाधीनता आणि मानसिक ताणतणाव यामुळे कौटुंबिक हिंसाचाराची समस्या उद्भवते. अनेक महिला आपल्या हक्कांविषयी अनभिज्ञ असल्यामुळे किंवा सामाजिक भीतीमुळे तक्रार नोंदवित नाहीत, त्यामुळे समस्या अधिक गंभीर बनते.

**5.** आरोग्याबाबत जागरूक नाही**:** अपुरी आरोग्यसेवा, पोषणाचा अभाव, स्वच्छतेच्या सवयींची कमतरता आणि प्रजनन आरोग्याविषयी अज्ञान यामुळे धर्मांतरित बौद्ध महिलांचे आरोग्य दुर्लक्षित राहते. ग्रामीण भागात आरोग्य केंद्रांची कमतरता, आर्थिक अडचणी आणि माहितीचा अभाव यामुळे महिलांना वेळेवर उपचार मिळत नाहीत. परिणामी मातामृत्यू, कुपोषण आणि दीर्घकालीन आजारांचे प्रमाण वाढते.

**6.** कायदेशीर जागृतीचा अभाव**:** धर्मांतरित बौद्ध महिलांमध्ये कायदेशीर हक्कांविषयी जागृती कमी आढळते. कौटुंबिक हिंसाचार प्रतिबंधक कायदा, मालमत्ता हक्क, घटस्फोट व सामाजिक सुरक्षा योजनांविषयी अपुरी माहिती असल्यामुळे महिलांना अन्याय सहन करावा लागतो. कायदेशीर साक्षरतेच्या अभावामुळे त्यांचे सक्षमीकरण मर्यादित राहते.

**7.** सामाजिक सहभाग व नेतृत्वातील मर्यादा**:** धर्मांतरित बौद्ध महिलांचा सामाजिक, राजकीय व सार्वजनिक क्षेत्रातील सहभाग तुलनेने कमी आहे. शिक्षणाचा अभाव, आत्मविश्वासाची कमतरता आणि सामाजिक बंधने यामुळे नेतृत्वाच्या संधी मर्यादित राहतात. परिणामी त्यांच्या समस्यांचा प्रभावीपणे आवाज उठविला जात नाही.

या समस्या समजून घेऊन त्यावर उपाययोजना करणे हे त्यांच्या सक्षमीकरणासाठी अत्यंत आवश्यक आहे.

## धर्मांतरित बौद्ध महिलांचे सक्षमीकरण

**1.** शैक्षणिक सक्षमीकरण**:** शिक्षण हे महिलांच्या सक्षमीकरणाचे सर्वात प्रभावी साधन आहे. धर्मांतरित बौद्ध महिलांचे शैक्षणिक स्तर उंचावल्यास त्यांच्यात आत्मविश्वास, निर्णयक्षमता आणि सामाजिक जागृती वाढते. प्राथमिक ते उच्च शिक्षणापर्यंत शिष्यवृत्ती, वसतिगृहे, मोफत शैक्षणिक साहित्य, डिजिटल शिक्षण सुविधा आणि मार्गदर्शन केंद्रे उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. विशेषतः ग्रामीण भागातील मुलींसाठी शिक्षणाच्या संधी वाढविल्यास दीर्घकालीन सामाजिक परिवर्तन घडून येऊ शकते.

**2.** आर्थिक सक्षमीकरण**:** आर्थिक स्वावलंबन हे महिलांच्या सामाजिक सक्षमीकरणाचा कणा आहे. धर्मांतरित बौद्ध महिलांना स्वयंरोजगार, कौशल्य विकास प्रशिक्षण, सूक्ष्म वित्त योजना आणि स्वयं-सहायता गटांच्या माध्यमातून आर्थिकदृष्ट्या सक्षम करता येते. बचत गट, महिला उद्योजकता, लघुउद्योग व घरगुती उद्योगांना प्रोत्साहन दिल्यास महिलांचे उत्पन्न वाढते आणि कुटुंबातील त्यांचे स्थान मजबूत होते.

**3.** सामाजिक सक्षमीकरण : सामाजिक सक्षमीकरणामध्ये महिलांना समान सन्मान, सामाजिक स्वीकार आणि आत्मभान मिळणे आवश्यक आहे. बौद्ध धर्मातील समता, करुणा व प्रज्ञेच्या मूल्यांवर आधारित सामाजिक जागृती कार्यक्रम राबविल्यास महिलांचा आत्मसन्मान वाढतो. सामाजिक भेदभाव निर्मूलनासाठी जनजागृती, संवाद व सामाजिक संघटनांची भूमिका अत्यंत महत्त्वाची ठरते.

**4.** कायदेशीर सक्षमीकरण : धर्मांतरित बौद्ध महिलांना त्यांच्या कायदेशीर हक्कांची माहिती असणे आवश्यक आहे. कौटुंबिक हिंसाचार प्रतिबंधक कायदा, मालमत्ता हक्क, घटस्फोटाचे कायदे, कामगार हक्क आणि सामाजिक सुरक्षा योजनांविषयी कायदेशीर साक्षरता कार्यक्रम राबविणे गरजेचे आहे. कायदेशीर ज्ञानामुळे महिलांना अन्यायाविरुद्ध आवाज उठविण्याची ताकद मिळते.

**5.** आरोग्य सक्षमीकरण : महिलांचे शारीरिक व मानसिक आरोग्य सुदृढ असणे हे सक्षमीकरणासाठी अत्यंत महत्त्वाचे आहे. मातृआरोग्य सेवा, पोषण आहार योजना, नियमित आरोग्य तपासणी शिबिरे आणि प्रजनन आरोग्याबाबत जागृती केल्यास महिलांचे जीवनमान सुधारते. मानसिक आरोग्यविषयक समुपदेशन सेवाही तितक्याच आवश्यक आहेत.

**6.** राजकीय व नेतृत्व सक्षमीकरण : स्थानिक स्वराज्य संस्था, ग्रामसभा, नगरपालिका व विविध सामाजिक संघटनांमध्ये धर्मांतरित बौद्ध महिलांचा सहभाग वाढविणे आवश्यक आहे. नेतृत्व प्रशिक्षण, राजकीय जागृती आणि निर्णय प्रक्रियेत महिलांचा सहभाग वाढवल्यास त्यांच्या समस्यांना योग्य व्यासपीठ मिळते. महिला नेतृत्व समाजपरिवर्तनासाठी प्रेरणादायी ठरते.

**7.** शासन व स्वयंसेवी संस्थांची भूमिका : केंद्र व राज्य शासनाच्या विविध महिला व अनुसूचित जाती कल्याणकारी योजनांचा प्रभावी लाभ मिळण्यासाठी योग्य अंमलबजावणी गरजेची आहे. स्वयंसेवी संस्था, सामाजिक चळवळी आणि महिला संघटनांच्या माध्यमातून सक्षमीकरणाची प्रक्रिया अधिक प्रभावी बनू शकते.

धर्मांतरित बौद्ध महिलांचे सक्षमीकरण हे बहुआयामी व सर्वांगीण स्वरूपाचे असले पाहिजे. शिक्षण, आर्थिक स्वावलंबन, सामाजिक सन्मान, कायदेशीर जागृती आणि नेतृत्व विकास यांच्या संयुक्त प्रयत्नातूनच धर्मांतरित बौद्ध महिलांचा खरा सक्षमीकरण साध्य होऊ शकतो. परंतु केंद्र व राज्य शासनाच्या विविध महिला व अनुसूचित जाती कल्याणकारी योजनांचा धर्मांतरित बौद्ध महिलांना लाभ मिळतो. मात्र माहितीचा अभाव, प्रशासकीय अडचणी आणि अंमलबजावणीतील त्रुटी यामुळे अपेक्षित परिणाम साधला जात नाही.

## धर्मांतरित बौद्ध महिलांच्या सर्वागिण विकासाकरीता सिफारशी

**1.** धर्मांतरित बौद्ध मुली व महिलांसाठी प्राथमिक ते उच्च शिक्षणापर्यंत विशेष शिष्यवृत्ती, मोफत शिक्षण साहित्य, वसतिगृहे व मार्गदर्शन केंद्रांची संख्या वाढवावी. मुलींचे शिक्षण अर्धवट राहू नये यासाठी पालक व समाजात जागृती निर्माण करावी.

**2.** महिलांसाठी स्थानिक गरजांनुसार कौशल्य विकास प्रशिक्षण (शिलाई, संगणक, डिजिटल सेवा, अन्नप्रक्रिया, हस्तकला इ.) राबवावे. रोजगाराभिमुख अभ्यासक्रमांमुळे महिलांचे आर्थिक स्वावलंबन वाढेल.

**3.** धर्मांतरित बौद्ध महिलांचे स्वयं-सहायता गट मजबूत करून सूक्ष्म कर्ज, बचत योजना व उद्योजकतेला प्रोत्साहन द्यावे. महिला बचत गटांच्या माध्यमातून लघुउद्योग सुरू करण्यासाठी आर्थिक व तांत्रिक सहाय्य उपलब्ध करून द्यावे.

**4.** महिलांना कौटुंबिक हिंसाचार प्रतिबंधक कायदा, मालमत्ता हक्क, कामगार हक्क आणि सामाजिक सुरक्षा योजनांविषयी कायदेशीर साक्षरता देणे आवश्यक आहे. प्रत्येक तालुक्यात महिला मदत केंद्रे व समुपदेशन सुविधा उपलब्ध करून द्याव्यात.

**5.** धर्मांतरित बौद्ध महिलांसाठी नियमित आरोग्य तपासणी शिबिरे, मातृआरोग्य सेवा, पोषण आहार योजना व मानसिक आरोग्य समुपदेशन प्रभावीपणे राबवावीत. ग्रामीण भागातील आरोग्य केंद्रांची क्षमता वाढवावी.

**6.** जातीय व लिंगाधारित भेदभाव दूर करण्यासाठी समाजजागृती कार्यक्रम, कार्यशाळा व चर्चासत्रे आयोजित करावीत. बौद्ध मूल्यांवर आधारित समता व मानवी प्रतिष्ठेची जाणीव समाजात रुजवावी.

**7.** स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये धर्मांतरित बौद्ध महिलांचा सहभाग वाढविण्यासाठी नेतृत्व प्रशिक्षण, राजकीय जागृती आणि निर्णय प्रक्रियेत महिलांना संधी द्यावी. महिला नेतृत्व घडविणे हे सामाजिक परिवर्तनासाठी आवश्यक आहे.

**8.** अनुसूचित जाती व महिला कल्याणकारी योजनांची अंमलबजावणी पारदर्शक व परिणामकारक करावी. लाभार्थ्यांपर्यंत योजना पोहोचण्यासाठी माहिती व मार्गदर्शन केंद्रे स्थापन करावीत.

**9.** स्वयंसेवी संस्था, सामाजिक संघटना व महिला मंडळांच्या सहकार्याने धर्मांतरित बौद्ध महिलांसाठी विकासात्मक कार्यक्रम राबवावेत. शासन व स्वयंसेवी संस्थांमध्ये समन्वय आवश्यक आहे.

**10.** धर्मांतरित बौद्ध महिलांच्या सामाजिक व आर्थिक स्थितीवर नियमित संशोधन, सर्वेक्षण व अभ्यास व्हावा. यामुळे धोरणनिर्मितीसाठी अचूक माहिती उपलब्ध होईल.

## निष्कर्ष

प्रस्तुत संशोधनातून असे स्पष्ट होते की धर्मांतरित बौद्ध महिलांचे सामाजिक व आर्थिक जीवन अनेक स्तरांवर संघर्षमय राहिले आहे. ऐतिहासिक अन्याय, जातीय भेदभाव, दारिद्र्य, अशिक्षण आणि पारंपरिक रूढी-परंपरांचा प्रभाव यामुळे या महिलांना दीर्घकाळ सामाजिक दुय्यमतेचा सामना करावा लागला. बौद्ध धर्मांतरामुळे त्यांना आत्मसन्मान, समानतेची जाणीव व वैचारिक मुक्ती मिळाली असली, तरीही प्रत्यक्ष सामाजिक व्यवहारात अनेक अडचणी अद्याप कायम आहेत. शिक्षण, आरोग्य, रोजगार, कौटुंबिक निर्णयप्रक्रिया आणि सामाजिक सहभाग या क्षेत्रांत धर्मांतरित बौद्ध महिलांची स्थिती समाधानकारक नसल्याचे आढळून येते. परंतु, संशोधनात हेही अधोरेखित होते की शिक्षण, संविधानिक हक्कांची जाणीव, स्वयं-सहायता गट, महिला बचत गट, शासनाच्या कल्याणकारी योजना आणि सामाजिक चळवळींमुळे या महिलांच्या सक्षमीकरणाची प्रक्रिया हळूहळू गती घेत आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचा प्रभाव,

बौद्ध मूल्यव्यवस्था आणि स्त्री-पुरुष समानतेचा संदेश यामुळे धर्मांतरित बौद्ध महिलांमध्ये आत्मविश्वास, नेतृत्वगुण आणि सामाजिक जागृती वाढताना दिसून येते.

एकूणच, धर्मांतरित बौद्ध महिलांच्या सामाजिक समस्या व सक्षमीकरण हा विषय केवळ स्त्री-अध्ययनापुरता मर्यादित नसून तो सामाजिक न्याय, मानवी हक्क आणि समावेशक विकासाशी संबंधित आहे. या महिलांचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी शासन, समाज आणि स्वयंसेवी संस्थांनी एकत्रितपणे प्रयत्न करणे आवश्यक आहे. असे झाल्यास धर्मांतरित बौद्ध महिलांचे जीवनमान उंचावून त्या समाजाच्या विकासात सक्रिय आणि सशक्त योगदान देऊ शकतील.

## संदर्भ सूची


1. आंबेडकर, डॉ. बाबासाहेब. (2014). बुद्ध आणि त्यांचा धम्म. मुंबई : सिद्धार्थ प्रकाशन.
2. आंबेडकर, डॉ. बाबासाहेब. (2013). स्त्री प्रश्न. मुंबई : महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ.
3. फुले, महात्मा जोतिराव. (2010). स्त्री-पुरुष तुलना. पुणे : महाराष्ट्र राज्य साहित्य मंडळ.
4. पाटील, सुलभा. (2016). भारतीय समाजातील महिलांचे सक्षमीकरण. औरंगाबाद : विद्या प्रकाशन.
5. शिंदे, एस. आर. (2018). दलित बौद्ध समाज : एक समाजशास्त्रीय अभ्यास. नागपूर : वर्धा प्रकाशन.
6. कड्डू, वंदना. (2017). दलित महिलांचे सामाजिक जीवन. मुंबई : ग्रंथाली प्रकाशन.
7. देशपांडे, सुनीता. (2015). स्त्री प्रश्न आणि सामाजिक न्याय. पुणे : प्रतिमा प्रकाशन.
8. महाराष्ट्र शासन. (2019). अनुसूचित जाती व नवबौद्ध कल्याण योजना. मुंबई : समाजकल्याण विभाग.
9. पवार, सरोज. (2020). बौद्ध समाज आणि सामाजिक परिवर्तन. नागपूर : बोधी प्रकाशन.
10. जाधव, मंगला. (2018). भारतीय समाजातील दलित महिलांचे प्रश्न. औरंगाबाद : दिशा प्रकाशन.